# ‘आयआयएम’ नागपूरचा भारतीय नौदलासोबत सामंजस्य करार

**नागपूर :** आयआयएम नागपूर व भारतीय नौदल यांच्यात दिल्ली येथे नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. त्यानुसार आयआयएम नागपूर ही भारतीय नौदलातील कर्मचाऱ्यांना व्यवसाय व्यवस्थापन, वित्तीय व्यवस्थापन व इतर कौशल्य प्रशिक्षण देणार आहे. भारतीय नौदलाचे व्हाइस ॲडमिरल दिनेश त्रिपाठी व आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. नौदलाची चमू लवकरच आयआयएम नागपूरला भेट देणार आहे. या सामंजस्य करारानुसार भारतीय नौदल आणि आयआयएम नागपूरचे कर्मचारी संबंधित संस्थांना परस्पर भेटी देतील.

